# महाराष्ट्र शासन

सहसंचालक (उच्चशिक्षण) छत्रपती संभाजीनगर विभाग,
पदमपूरा, देवगिरी महाविद्यालय जवळ, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर.
Web: www.jdheaur.org 	Email Id: jdheaur_2007@rediffmail.com
दूरध्वनी.०२४०-२३३१९१३ 	फॅक्स २३३१९१३

सहस/ससंउशिसं/आस्था/२०२५-२६/ 	दिनांकः-०५/०५/२०२५

**अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादेत**

प्रति,
प्राचार्य,
अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,
विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र तसेच
शारीरिक शिक्षण महाविद्यालये,
छत्रपती संभाजीनगर विभाग

विषय :- अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये कार्यरत शिक्षकेतर कर्मचा-यांचा सेवा तपशिल सादर करणे बाबत..

.संदर्भः- १. शासन पत्र क्रं. HTED-E-Comp-१०६०२५४/२०२५/MHT(HE-५), दि. १७/०४/२०२५
२. मा. शिक्षण संचालक,उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र क्रमांक अशाम/२०२५/Comp- No.१५९६५६५/ अनुवि/अनु.कोवि/मावि-२/दि.१८/०४/२०२५
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र क्रमांक अशाम/२०२५/Comp- No.१५९६५६५/ अनुवि/अनु.कोवि/मावि-२/दि.२४/०४/२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, अनुदानित महाविद्यालयामध्ये वित्त विभागाच्या शासन निर्णय दि. ०२.०६.२०१५ व शासन निर्णय दि. १५-०१-२०१६ नंतर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीस मान्यता दिलेली नसतांना शासन विहित केलेली प्रक्रिया न करता कायम विना अनुदानित/विना अनु.विभागातील/पदावरील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना बदलीने अनुदानित महाविद्यालयात/ विभागात पदावर नियूक्त्या दिल्या असल्यास अशा प्रकारच्या नियूक्त्या तात्काळ रदद करुन अशा कर्मचा-यांची नावे एचटीई सेवार्थ प्रणालीमधून वगळण्याची कार्यवाही करण्या बाबतचे निर्देश प्राप्त झालेले आहे. (प्रत सोबत)

**तरी आपल्या महाविद्यालयातील कार्यरत शिक्षकेतर कर्मचा-याची अचूक माहिती यासोबत दिलेल्या (MS-Excel Sheet Soft Copy) व पीडीफ स्वरुपात प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह दोन प्रतीत तयार करुन शासकीय अध्यापक महाविद्यालय, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर येथे महाविद्यालयातील माहितीगार कर्मचा-यासह खालील दिलेल्या वेळापत्रकानुसार न चूकता करावी.**

**“तसेच ज्या महाविद्यालयाकडून सदरची माहिती प्राप्त होणार नाही, त्या महाविद्यालयाचे वेतन अनूदान अदा केले जाणार नाही याची कटाक्षाने नोंद घ्यावी”**

पान क्रमांक ०२

| अ क्र | जिल्हा | माहिती सादर करावयाचा दि. | अ क्र | जिल्हा | माहिती सादर करावयाचा दि. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | छत्रपती संभाजीनगर | ०६/०५/२०२५ | ०३ | बीड | ०७/०५/२०२५ |
| ०२ | जालना | ०६/०५/२०२५ | ०४ | धाराशिव | ०७/०५/२०२५ |

कर्मचारी निहाय सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी

१.कर्मचा-याचे मूळसेवापूस्तीका

२.कर्मचा-याचे जातीचे प्रमाणपत्र-शैक्षणिक अर्हता,तांत्रिक अर्हता, संगणक अर्हताव इतर आवश्यक कागदपत्रे

३.महाविद्यालये /संस्थेची वेळावेळीच्या बिंदूनामावलीची प्रत

४.याकार्यालयाचे वेळोवेळी पदभरती घेतलेले नाहरकत प्रमाणपत्र

५.नियूक्तीच्या वेळी दिलेली जाहीरातीची प्रत

६.विहित निवड समितीचा अहवालाची प्रत

७.संस्था/ महाविद्यालय यांचे नियूक्ती आदेश

८.नियूक्ती आदेशास या कार्यालयाच्या मान्यतेची प्रत

९.संस्था / महाविद्यालय १०० टक्के अनूदान प्राप्त झाल्याचे आदेश

१०.एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ठ करण्यासाठी सादर करण्यात आलेला प्रस्तावाची प्रत

११.वरील कागदपत्रांव्यतिरिक्त MS-Excel Sheet मधील स्तंभ क्रमांक १ ते ४० च्या पूष्ठयार्थ आवश्यक सर्व मूळ साक्षांकित कागदपत्रे

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे अ क्र १ ते ११ बाबतची सर्व कागदपत्रे तपासणी करीता सोबत सादर करणे आवश्यक आहे.

Signed by Ranjitsing
Krishnarao Nimbalkar
Date: 05-05-2025 19:31:26

(डॉ. रणजितसिंह कृ.निंबाळकर)
सहसंचालक,उच्च शिक्षण
छत्रपती संभाजीनगर विभाग,
**छत्रपती संभाजीनगर.**